# एईएमएल-जीच्या आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या मध्यावधी आढावा याचिकेचा सारांश

**१. परिचय**

माननीय आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय दर) नियमन, २०१९ (यापुढे "एमवायटी विनियम, २०१९" म्हणून संदर्भित) ०१-०८-२-०१९ रोजी जारी केले. हे नियम आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत लागू असतील. एमवायटी नियमन, २०१९ च्या नियमन ५.१ (ब) मध्ये मध्यावधी आढावा (एमटीआर) याचिका दाखल करण्याची तरतूद आहे :

१. आर्थिक वर्ष २०१९-२० चे अचूक समायोजन एमईआरसी (बहु वार्षिक दर) नियमन, २०१५ अंतर्गत केले जाणार आहे.

२. आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चे प्रस्तावित अचूक समायोजन एमवायटी नियमन, २०१९ अंतर्गत आहे.

३. आर्थिक वर्ष २०२२-२३ चे हंगामी अचूक समायोजन एमवायटी नियमन, २०१९ अंतर्गत आहे.

४. एकूण आवश्यक महसूलाचा सुधारित अंदाज (एआरआर), विद्यमान दर आणि शुल्कापासून अपेक्षित महसूल, अपेक्षित महसूल तफावत आणि नियंत्रण कालावधीच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी प्रस्तावित श्रेणीनुसार दरपत्रक.

एईएमएल-जी ने वरीलनुसार एमटीआर याचिका दाखल केली आहे

**२. २०१९-२० च्या आर्थिक वर्षातील तत्थ्य**

**२.१ परिचनल कामगिरी**

एईएमएल-जी कंपनीमार्फत ५०० मेगावॅट क्षमतेचे एक आष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्र (अदाणी डहाणू थर्मल पॉवर स्टेशन - एडीटीपीएस) कार्यान्वित आहे. एमवायटी नियमन, २०१५ नुसार ८५% च्या मानक उपलब्धतेच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये एडीटीपीएसची वास्तविक उपलब्धता ९१.९३% होती. तथापि एमएसएलडीसीने सूचना मागे घेतल्याने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये एडीटीपीएसचे पीएलएफ मानक हे एमवायटी नियमन, २०१५ नुसार निश्चित ८५% पीएलच्या तुलनेत ७६.२२% पर्यंत कमी होते. इतर प्रतिसाद मानांकनामध्ये, एडीटीपीएस कामगिरी आर्थिक वर्ष २०१९-२० मधील बहुतांश मानांकनांपेक्षा उत्तम होती.

**२.२ ऊर्जा शुल्क**

एईएमएल-जी ने एमवायटी नियमन, २०१५ नुसार इंधनाचे वास्तविक मूल्य आणि मानक उष्मांक मूल्ये विचारात घेत आर्थिक वर्ष २०१९-२० साठी ऊर्जा शुल्काची गणना केली आहे.

## २.३ निश्चित शुल्क

एईएमएल-जी ने एमवायटी नियमन, २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी निश्चित शुल्काच्या घटकांची गणना केली आहे.

• एईएमएल-जी ने एमवायटी विनियम, २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मानक परिचलन आणि देखभाल खर्चाची गणना केली आहे आणि मानक परिचलन आणि देखभाल खर्चामध्ये निव्वळ हक्क निश्चित करण्यासाठी २०१९-२० च्या वास्तविक मानक परिचलन आणि देखभाल खर्चाशी तुलना केली आहे.

• एईएमएल-जी ने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रत्यक्ष भांडवल विचारात घेतले आहे आणि एमवायटी नियमन, २०१५ नुसार आर्थिक वर्ष २०१९-२० साठी घसारा खर्च गणला आहे.

• कर्जावरील व्याज आणि समभागावरील परताव्याची गणना ही एमवायटी नियमन, २०१५ नुसार मानक कर्ज समभाग प्रमाण लक्षात घेत करण्यात आली आहे.

• कार्यरत भांडवलावरील व्याज (आदर्श) एमवायटी नियमन, २०१५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या सूत्रानुसार गणले आहे. एईएमएल-जी ने कार्यरत भांडवलावरील व्याजातील निव्वळ हक्क निश्चित करण्यासाठी त्याची वास्तविकतेसह तुलना केली आहे.

• प्राप्तिकराची गणना एमवायटी नियमन, २०१५ नुसार करपूर्व नियामक नफा (पीबीटी) नुसार केली आहे.

• महसुलातील तफावत/(अतिरिक्त) निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष बिगर शुल्क उत्पन्न आणि वीज विक्रीतून मिळणारा वास्तविक महसूल विचारात घेतला गेला आहे.

एईएमएल-जी चा आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अचूक समायोजनाचा सारांश पुढील तक्त्यामध्ये नमूद केला आहे :

**तक्ता क्र. १ : आर्थिक वर्ष २०१९-२० चा सारांश**

| तपशील/(रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **अचूक समायोजन (निव्वळ हक्क)** |
|---|---|---|
| इंधन संबंधित खर्च | १,२२६.०७ | १,०६४.१७ |
| इतर इंधन खर्च | - | ३.७७ |
| परिचलन व देखभाल खर्च | १६२.२० | १७६.९४ |
| घसारा खर्च | ३४.४९ | ३४.६३ |
| दिर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | १५.५६ | १५.९४ |
| विदेशी चलनातील दर तफावत | - | १३.१४ |
| वित्त पुरवठा शुल्क | - | ५.२३ |
| पुनर्वित्त पुरवठा शुल्क | - | २.८३ |
| व्याजदर मूल्य बचतीवरील पीव्ही | - | (०.४६) |
| कार्यरत भांडवलावरील व्याज | २२.२९ | १८.४४ |
| प्राप्तीकर | - | २१.२१ |
| **एकूण महसुली खर्च** | **१,४६०.६१** | **१,३५५.८४** |

| तपशील/(रु. कोटी) | **एमवायटी आदेश** | **अचूक समायोजन (निव्वळ हक्क)** |
|---|---|---|
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ९६.४५ | ९६.७९ |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | १८.९३ | १९.६१ |
| एकूण महसूल आवश्यकता | **१,५३८.१३** | **१,४३३.०२** |
| **महसूल** | | |
| वीज विक्रीतून महसूल – निश्चित शुल्क | ३४६.६२ | ३४६.६२ |
| वीज विक्रीतून महसूल – परिवर्तनीय शुल्क | १,२२६.८३ | १,१२३.३० |
| **एकूण महसूल तफावत/(अतिरिक्त)** | **(३५.३२)** | **(३६.९०)** |

एमवायटी आदेशप्रसंगी अनुमती दिलेल्या महसुली अधिशेषाच्या तुलनेत वाढल्यानंतर आर्थिक वर्ष २०१९-२० साठी महसुली अधिशेषात झालेली वाढ ही प्रामुख्याने आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये इंधन खर्चात (निव्वळ हक्क) कपात झाल्यामुळे आहे. तसेच वित्त पुरवठा आणि पुनर्वित्त पुरवठा शुल्क हे अचूक समायोजनप्रसंगी दावा करण्यात आले आहेत्. तसेच ३०.०३.२०२० रोजीच्या एमवायटी आदेशात आर्थिक वर्ष २०१९-२० साठी प्राप्तिकर आकारण्यास परवानगी नव्हती. आर्थिक वर्ष २०१९-२० साठी नियामक पीबीटी पद्धतीवरील प्राप्तिकर आता अचूक समायोजनासाठी दावा केला जात आहे.

## ३ आर्थिक वर्ष २०२०-२१, आर्थिक वर्ष २०२१-२२ पर्यंत आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंतचे अचूक समायोजन

### ३.१ परिचलन कामगिरी

एमवायटी नियमन, २०१५ नुसार ८५% च्या मानक उपलब्धतेच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये एडीटीपीएसची वास्तविक उपलब्धता ९८.७८% आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ८७.९७% होती. एमएसएलडीसीने सूचना मागे घेतल्याने आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील एडीटीपीएसचे पीएलएफ मानक हे एमवायटी नियमन, २०१५ नुसार निश्चित ८५% पीएलएफच्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये ७३.२०% आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ७६.२१% असे कमी होण्याची शक्यता आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी पीएलएफ ७७.५६% असण्याची शक्यता आहे.

### ३.२ ऊर्जा शुल्क

एईएमएल-जी ने आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी ऊर्जा शुल्काची गणना एमवायटी नियमन, २०१९ नुसार मानांकनासह इंधनाचे वास्तविक शुल्क आणि उष्मांक मूल्य विचारत घेत केली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी एईएमएल-जी ने ऊर्जा शुल्काची गणना आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या पहिल्या सहा महिन्यांतील वास्तविक इंधन खर्च आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या उर्वरित सहा महिन्यांतील अंदाजे इंधन खर्च लक्षात घेत केली आहे.

### ३.३ निश्चित शुल्क

एईएमएल-जी ने एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२०-२१, आर्थिक वर्ष २०२१-२२ आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी निश्चित शुल्काची गणना केली आहे.

• एईएमएल-जी ने एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी मानक परिचलन आणि देखभाल खर्चाची गणना केली आहे आणि वास्तविक परिचलन आणि देखभाल खर्चाची तुलना परिचनल आणि देखभाल खर्चातील निव्वळ हक्क निश्चित करण्यासाठी केली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये एईएमएल-जी ने तात्पुरत्या आधारावर परिचनल आणि देखभाल खर्चाचा दावा केला आहे.

• एईएमएल-जी ने एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष भांडवल विचारात घेतले आहे आणि आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी तसेच आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी घसारा खर्च लक्षात घेतला आहे. एईएमएल - जी ने आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील अंदाजे भांडवल लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी घसारा मोजला आहे.

• कर्जावरील व्याज आणि समभागावरील परतावा (प्रभावी कर दराने मिळविलेले) यांची गणना एमवायटी नियमन, २०१९ नुसार मानक कर्ज समभाग प्रमाण लक्षात घेऊन केली गेली आहे.

• एमवायटी नियमन, २०१५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या सूत्रानुसार आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी कार्यरत भांडवलावरील व्याजाची गणना केली गेली आहे. कोविड-१९ साथ प्रसार प्रभावित आर्थिक वर्ष २०२०-२१ पासून, एईएमएल - जी ने आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी कार्यरत भांडवलावरील वास्तविक व्याजासाठी दावा केला आहे.

आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी, एईएमएल - जी ने कार्यरत प्रत्यक्ष भांडवलावरील व्याजाची तुलना कार्यरत भांडवलावरील नक्त हक्क निश्चितीबरोबर केली आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी, एईएमएल-जी ने सामान्य आधारावर कार्यरत भांडवलावरील व्याजासाठी दावा केला आहे.

• वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी महसुली तफावत/(अतिरिक्त) निश्चित करण्यासाठी एईएमएल-जीने वास्तविक बिगर शुल्क उत्पन्न आणि वीज विक्रीतून मिळणारा वास्तविक महसूल विचारात घेतला आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी, एईएमएल-जी ने अंदाजित बिगर शुल्क उत्पन्न आणि वीज विक्रीतून मिळणारा महसूल विचारात घेतला आहे.

आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी अचूक समायोजनाचा सारांश पुढील तक्त्यामध्ये दर्शविला आहे :

**तक्ता क्र. २ : आर्थिक वर्ष २०२०-२१ चा अचूक समायोजन सारांश**

| तपशील/ (रु. कोटी) | एमवायटी आदेश | अचूक समायोजन (नक्त हक्क) |
|---|---|---|
| इंधन संबंधित खर्च | १,४०३.१० | ९९८.६१ |
| इतर इंधन खर्च | ०.०० | ०.१४ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १६८.३५ | १७७.६९ |
| घसारा खर्च | ३६.०० | ३७.९३ |
| दिर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | १६.०३ | १३.९५ |
| विदेशी चलन दरातील फरक | ०.०० | -५.२१ |
| वित्त पुरवठा शुल्क | ०.०० | २.१२ |

| तपशील/ (रु. कोटी) | एमवायटी आदेश | अचूक समायोजन (नक्त हक्क) |
|---|---|---|
| पुनर्वित्त पुरवठा शुल्क | ०.०० | ०.११ |
| कार्यरत भांडवलावरील व्याज | २३.०३ | २६.१६ |
| **एकूण महसुली खर्च** | **१,६४६.५१** | **१,२५१.५१** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ८९.५५ | १५१.८३ |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | १९.९५ | ७.३० |
| **एकूण महसुली आवश्यकता** | **१,७१६.०९** | **१,३९६.०४** |
| **महसूल** | | |
| वीज विक्रीतील महसूल – स्थिर शुल्क | ३१२.९९ | ३१२.९९ |
| वीज विक्रीतील महसूल – परिवर्तनीय शुल्क | १,४०३.१० | १,०४३.९९ |
| **एकूण महसुल तफावत/(अतिरिक्त)** | **-** | **३९.०६** |

एमवायटी आदेशात आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी अनुमती दिलेल्या समभागावरील परताव्याच्या (आरओई) तुलनेत अचूक समायोजनानंतरची आर्थिक वर्ष २०२०-२१ मधील महसूल तफावत ही प्राथमिकरित्या आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता समभागावरील परताव्यामध्ये वाढ झाल्याचा दाव्यामुळे आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये इंधन खर्चात (नक्त हक्क) कपात करून या वाढीची काही प्रमाणात भरपाई केली गेली आहे.

आर्थिक वर्ष २०२१-२२ साठीचा अचूक समायोजन सारांश पुढील तक्त्यामध्ये नमूद केला आहे :

**तक्ता क्र. ३ : आर्थिक वर्ष २०२१-२२ चा सारांश**

| तपशील/(रु. कोटी) | एमवायटी आदेश | अचूक समायोजन (नक्त हक्क) |
|---|---|---|
| इंधन संबंधित खर्च | १,४४४.९१ | १,०८१.७० |
| इतर इंधन खर्च | - | ०.२२ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १७३.५० | १८४.७० |
| घसारा खर्च | ३८.७३ | ३७.०६ |
| दिर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | १७.३६ | १३.५३ |
| विदेशी चलन दर फरक | - | १.२१ |
| वित्त पुरवठा शुल्क | - | ०.९५ |
| पुनर्वित्त पुरवठा शुल्क | - | ०.९५ |
| व्याजदर मूल्य बचतीचे पीव्ही | - | ०.१२ |
| कार्यरत भांडवलावरील व्याज | २३.७३ | १८.०८ |
| **एकूण महसूल खर्च** | **१,६९८.२३** | **१,३३८.५०** |
| अधिक : समभाग भांडवलावरील परतावा | ९२.६७ | १५४.८० |
| उणे : बिगर शुल्क उत्पन्न | १९.९५ | १६.९१ |
| **एकूण महसूल आवश्यक** | **१,७७०.९३** | **१,४७६.३९** |
| **महसूल** | | |

| तपशील/(रु. कोटी) | एमवायटी आदेश | अचूक समायोजन (नक्त हक्क) |
|---|---|---|
| वीज विक्री महसूल– स्थिर शुल्क | ३२६.०३ | ३२६.०३ |
| वीज विक्री महसूल –परिवर्तन शुल्क | १,४४४.९१ | १,१३०.७१ |
| **एकूण महसूल तफावत/(अतिरिक्त)** | **-०.०१** | **१९.६५** |

एमवायटी आदेशात आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अनुमती दिलेल्या समभागावरील परताव्याच्या (आरओई) तुलनेत अचूक समायोजनानंतरची आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील महसूल तफावत ही प्राथमिकरित्या आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता समभागावरील परताव्यामध्ये वाढ झाल्याचा दाव्यामुळे आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये इंधन खर्चात (नक्त हक्क) कपात करून या वाढीची काही प्रमाणात भरपाई केली गेली आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी हंगामी अचूक समायोजनाचा सारांश पुढे दिला आहे :

**तक्ता क्र. ४ : आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी हंगामी अचूक समायोजनाचा सारांश**

| तपशील/(रु. कोटी) | एमवायटी आदेश | सूचक समायोजन तरतूद |
|---|---|---|
| इंधन संबंधित खर्च | १४८७.९७ | १३७०.७५ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १७८.८० | २०१.७५ |
| वेळापत्रक शुल्क | ०.०० | ०.३१ |
| घसारा खर्च | ४०.२३ | ३८.१४ |
| दीर्घकालीन कर्ज भांडवलावर व्याज | १८.०६ | १३.२८ |
| कार्यरत भांडवलावरील व्याज | २४.४५ | २३.६९ |
| एकूण महसूल खर्च | **१७४९.५१** | **१६४७.९१** |
| अधिक : समभाग भांडवलावर परतावा | ९५.५१ | ११२.५२ |
| उणे : बिगर दर उत्पन्न | १९.९५ | १५.३० |
| **एकूण महसूल आवश्यकता** | **१८२५.०८** | **१७४५.१३** |
| महसूल | | |
| वीज विक्री महसूल - निश्चित शुल्क | ३३७.११ | ३३७.११ |
| वीज विक्री महसूल - परिवर्तनीय शुल्क | १४८७.९७ | १३७०.७५ |
| एकूण महसुलातील अंतर/(अतिरिक्त) | **-** | **३७.२८** |

एमवायटी आदेशात आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी अनुमती दिलेल्या समभागावरील परताव्याच्या (आरओई) तुलनेत अचूक समायोजन तरतूदनंतरची आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील महसूल तफावत ही प्राथमिकरित्या आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता समभागावरील परताव्यामध्ये वाढ झाल्याचा दाव्यामुळे आहे.

## ४. आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत संचयी महसूल तफावत/अतिरिक्त

आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंतची संचयी महसुलातील तफावत/(अतिरिक्त) पुढील तक्त्यामध्ये दर्शविली आहे :

**तक्ता क्र. ५ : वहन/धारण खर्चासह आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंत मागील तफावत/अतिरिक्त**

| तपशील | रु. कोटी |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१९-२० करिता वाढीव तफावत / (अतिरिक्त) | (१.५९) |
| आर्थिक वर्ष २०१९-२० करिता वाढीव तफावत / (अतिरिक्त) वरील मूल्य | (३.७९) |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता वाढीव तफावत / (अतिरिक्त) | ३९.०६ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ करिता तफावत / (अतिरिक्त) वरील मूल्य | १०.५३ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता तफावत / (अतिरिक्त) | १९.६५ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता तफावत / (अतिरिक्त) वरील मूल्य | ३.६२ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता तफावत / (अतिरिक्त) अंदाजित | ३७.२८ |
| **एकूण** | **१०४.७७** |

## ५. आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित एकूण महसुलाची आवश्यकता

### ५.१ परिचलन कामगिरी

एईएमएल - जी ने आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी उपलब्धता आणि पीएलएफ अनुक्रमे ९२.९०% आणि ९३.०१% अंदाजित केला आहे. एमवायटी नियमन, २०१९ नुसार इतर परिचलन मानांकनांचा विचार हा मानक स्तरावर केला गेला आहे.

### ५.२ ऊर्जा शुल्क

एईएमएल - जी ने एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ऊर्जा शुल्काच्या अंदाजासाठी स्वच्छ कोळसा, आयात कोळसा आणि कच्च्या कोळशाच्या खर्चाचा विचार केला आहे. उष्मांक मूल्ये आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या पहिल्या सहा महिन्यांसाठी उपलब्ध आकडेवारी वास्तविकतेच्या आधारावर विचारात घेण्यात आली. प्रक्षेपित इंधन खर्चासाठी, एईएमएल - जी ने स्वच्छ कोळशाच्या माध्यमातून १००% कोळशाची गरज गृहित धरली आहे.

### ५.३ निश्चित शुल्क

- एईएमएल - जी ने एमवायटी नियमन, २०१९ नुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी परिचलन आणि देखभाल खर्चाचा दावा केला आहे.

- एईएमएल - जी ने आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी भांडवल अंदाज बांधला आहे आणि तात्पुरत्या आधारावर आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी घसारा खर्च गृहित धरला आहे.

• कर्जावरील व्याज आणि समभागावरील परतावा (प्रभावी कर दराने मिळविलेले) यांची गणना एमवायटी नियमन, २०१९ नुसार मानक कर्ज समभाग प्रमाण लक्षात घेऊन केली गेली आहे.

• तात्पुरत्या आधारावर आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी कार्यरत भांडवलावर व्याजाचा दावा करण्यात आला आहे.

• आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी बिगर दर उत्पन्नाचा विचार आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या समान स्तरावर तात्पुरत्या आधारावर केला गेला आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित एआरआरचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्र. ६ : आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील सुधारित एआरआरचा सारांश**

| तपशील / (रु. कोटी) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (एमवायटी आदेश) | आर्थिक वर्ष २०२३-२४ (अंदाजित) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (एमवायटी आदेश) | आर्थिक वर्ष २०२४-२५ (अंदाजित) |
|---|---|---|---|---|
| इंधन संबंधित खर्च | १५३६.७७ | १४१४.४७ | १५७८.०० | १४१६.२६ |
| परिचलन आणि देखभाल खर्च | १८४.२७ | २११.४१ | १८९.९२ | २२१.५४ |
| घसारा खर्च | ३४.०२ | ३९.१७ | ३४.८० | ४०.२० |
| कर्ज भांडवलावर व्याज | १८.७६ | १२.९९ | १९.८९ | १२.५२ |
| कार्यरत भांडवलावरील व्याज | २५.१८ | २५.६० | २५.९३ | २५.७६ |
| **एकूण महसूल खर्च** | **१७९९.००** | **१७०३.६४** | **१८४८.५४** | **१७१६.२७** |
| अधिक : समभाग भांडवलावर परतावा | ९८.२० | ११५.२८ | १०१.०१ | ११७.७५ |
| उणे : बिगर दर उत्पन्न | १९.९५ | १५.३० | १९.९५ | १५.३० |
| एकूण महसूल आवश्यकता | **१८७७.२५** | **१८०३.६३** | **१९२९.६१** | **१८१८.७३** |
| आर्थिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या वहन मूल्यासह आर्थिक वर्ष २०२२-२३ पर्यंतची मागील तफावत | - | १०४.७७ | - | - |
| एकूण महसूल | **१८७७.२५** | **१९०८.३९** | **१९२९.६१** | **१८१८.७३** |

वरील आधारावर आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता प्रस्तावित वार्षिक स्थिर शुल्क (एएफसी) आणि परिवर्तनीय शुल्क पुढे कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत. ते माननीय आयोगाच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहेत.

**तक्ता क्र. ७ : आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता स्थिर शुल्क आणि ऊर्जा शुल्क**

| **तपशील / (रु. कोटी)** | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२३-२४ (प्रस्तावित)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (एमवायटी आदेश)** | **आर्थिक वर्ष २०२४-२५ (प्रस्तावित)** |
|---|---|---|---|---|
| स्थिर शुल्क (रु. कोटी) | ३४०.४८ | ४९३.९२ | ३५१.६० | ४०२.४७ |
| ऊर्जा शुल्क (रु./केडब्ल्युएच) | ४.१०५ | ३.८३९ | ४.२२७ | ३.८३९ |

**६ प्रार्थना**

माननीय आयोगास पुढील म्हणणे मान्य व्हावे अशी एईएमएल - जी विनंती करते :

१. याद्वारे सादर केल्याप्रमाणे याचिका स्वीकारावी;

२. आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अचूक समायोजनाने वहन/धारण खर्चासहची प्रत्यक्ष महसुलातील तफावत/अतिरिक्त या याचिकेत नमूद केल्याप्रमाणे मंजूर करावी;

३. या याचिकेत नमूद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरती एआरआर आणि महसूल अंतर/अतिरिक्त मंजूर करावे;

४. या याचिकेत प्रक्षेपित केल्याप्रमाणे, नियंत्रण कालावधीच्या चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी म्हणजे आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एआरआर मंजूर करावे;

५. या याचिकेत प्रक्षेपित केल्यानुसार, आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी अदाणी डहाणू आष्णिक ऊर्जा केंद्र (एडीटीपीएस) साठी निश्चित शुल्क आणि ऊर्जा शुल्क मंजूर करावे;

६. एमवायटी नियमन, २०१५ आणि एमवायटी नियमन, २०१९ मधील विशिष्ट विचलनास अनुमती द्यावी, अशी या याचिकेत मागणी केली आहे;

७. मागील दरविषयक आदेशामध्ये केलेल्या निर्णयांचा पुनर्विचार/शिथिलता यासाठी या याचिकेत करण्यात आलेली विशिष्ट विनंती मंजूर करावी;

८. भविष्यात याचिकेत भर/ फेरफार / बदल करण्यास अनुमती द्यावी;

९. याचिकेत असलेल्या, कोणत्याही अनवधानाने झालेल्या चुका/ विसंगती/ वगळणे/ तफावतीची पूर्तता करणे इत्यादींबाबत क्षमा करणे;

१०. आयोगाला जारी करणे योग्य वाटेल अशी कोणतीही इतर सवलत किंवा आदेश आणि निर्देश द्यावा.

किशोर पाटील

मुंबई — अधिकृत प्रतिनिधी

२१ डिसेंबर २०२२ — अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.